# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे.
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५११७७/१०
**ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/अभिलेख धारिका क्र. ७५० /ओळखपत्र/सन २०१८/४४११ दि. १८/६/२०१८.

**वाचले** :-

१. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१)(अ) मधील तरतुद.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ४३ मधील तरतुद.

**:: परिपत्रक ::**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका होणार असून त्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली पार पाडावयाच्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्व प्रकारच्या निवडणूका हया मोकळा व भयमुक्त वातावरणात तसेच अचूक व पारदर्शक पध्दतीने पार पाडण्याचे धोरण प्राधिकरणाने निश्चित केलेले आहे.

त्या अनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकांमध्ये मतदान करतांना मतदाराची ओळख पटविण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ४३ अनुसार भारत/ राज्य निवडणूक आयोग, केंद्र सरकार अथवा राज्य शासन यांच्याकडून विहीत करण्यात आलेला छायाचित्र असलेला ओळखीचा पुरावा मतदारांनी स्वत: जवळ बाळगणे अनिवार्य आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने तसेच संबंधीत मतदान केंद्रावरील मतदान अधिकाऱ्याने सदर नमुद ओळख पत्र पाहुन मतदाराची खात्री करुन मतदान प्रक्रिया पार पाडण्याची कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार.**

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत** :-

१. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

त्यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रकातील सुचना संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात.

३. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)